# एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळले




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४




■ वर्ष ७५ वे/अंक २९५ वा ■ ■ अमरावती, शुक्रवार,दिनांक १३ जून २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर २३ ज्येष्ठ १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




# एअर इंडिया विमान अपघातात २४१ प्रवाशांचा मृत्यू



अहमदाबाद दि. १२ : गुजरातमधील अहमदाबाद विमान दुर्घटनेचा व्हिडिओ समोर आला अन् अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. २४१ प्रवाशांसह अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरुन लंडनसाठी उड्डाण घेतलेलं विमान अवघ्या ७ मिनिटांत खाली कोसळलं. विमान दुर्घटनेचे वृत्त समोर येताच विमानातील प्रवाशांसाठी प्रार्थना होऊ लागल्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाने व बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीला सुरुवात केली. मात्र, दुर्घटनेचा व्हिडिओ पाहून मनात जी शंका न राहून होती होती, अखेर तेच घडलं. एअर इंडियाच्या ७८७ विमानातील सर्वच्या सर्व २४२ प्रवाशांचा या दुर्घटनेत मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. गुजरामधील पोलीस आयुक्तांशी संवाद साधल्यानंतर ही माहिती समोर आली आहे.



गुजरातच्या अहमदाबादमध्ये झालेल्या विमान दुर्घटनेत विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला. महत्त्वाचं म्हणजे या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हे सुद्धा प्रवास करत होते. एअर इंडियाचे ७८७ हे विमान अहमदाबादवरुन लंडनकडे निघालं होतं. दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी विमानानं लंडनसाठी उड्डाण केल्यानंतर अवघ्या ७ मिनिटात हे विमान कोसळलं. विमानाने हवेत टेक ऑफ *(पान २ वर)*

## माहोल....




निशब्द झालो आहे या दुर्घटनेने...भावपूर्ण श्रद्धांजली!!

## माजी मुख्यमंत्री विजय रुपाणींचे निधन

गुजरातमधील अहमदाबादमध्ये गुरूवारी दुपारी एअर इंडियाचे विमान कोसळले. या विमानात २४२ प्रवासी होते. विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणीही प्रवास करत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात विजय रुपाणींचाही समावेश आहे. विजय रुपाणीच्या *(पान २ वर)*



## विमान दुर्घटनेत रमेश विश्वकुमार सुदैवाने बचावले

गुजरातच्या अमहमदाबाद येथे विमान अपघाताची मोठी दुर्घटना घडली आहे. या अपघातानंतर विमानाचा अक्षरशः चुराळा झाला. विमानाचे अवशेष अस्थाव्यस्थ पडलेले बघायला



मिळाले. विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला. त्यामुळे या अपघातात अनेक जण दगावल्याची भीती वर्तवली जात आहे. घटनास्थळावरचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. हे व्हिडीओ सुन्न करणारे आहेत. अपघातग्रस्तांच्या बचावासाठी युद्ध *(उर्वरित पान २ वर)*

## टाटा ग्रुपकडून मृतांच्या वारसांना प्रत्येकी १ कोटींची मदत

मुंबई दि. १२ : अहमदाबाद विमान दुर्घटनेत एअर इंडियाच्या बोईंग १७१ फ्लाईटमधील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला असून सुदैवाने १ प्रवासी बचावला आहे. अत्यंत वेदनादायी आणि दुर्दैवी घटनेनं देश शोकसागरात बुडाला असून २४१ प्रवाशांच्या कुटुंबीयांवर आणि नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे. एअर इंडिया ही कंपनी टाटा ग्रुपने घेतल्याने या विमान दुर्घटनेनंतर टाटा ग्रुपकडूनही दु:ख व्यक्त करण्यात आलं आहे. अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारत आणि सामाजिक जाणीव ठेऊन टाटा ग्रुपने विमान दुर्घटनेतील जीव गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, जखमींचा वैद्यकीय खर्च देखील टाटा ग्रुपकडूनच करण्यात येणार असून आवश्यक ती सर्व काळजी आणि मदत जखमींना मिळेल, असे टाटा ग्रुपने म्हटले आहे. *(पान २ वर)*

## सिव्हील हॉस्पीटलमधील ५० रहिवासी जखमी

गुजरातच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव धनंजय द्विवेदी यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत करून आरोग्य विभाग व रुग्णालय प्रशासनाकडील माहिती शेअर केली.

द्विवेदी म्हणाले, हे विमान अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटल, स्टाफ क्वार्टर्स व इतर निवासी भागात कोसळलं आहे. यामुळे विमानातील प्रवाशांसह रहिवासी भागात मोठी हानी झाली आहे. ५० हून अधिक जखमी रहिवाशांना *(उर्वरित पान २ वर)*






















■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम